अति तात्काळ

महाराष्ट्र शासन

"दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)"

नगरपरिषद प्रशासन संचालनालय (DMA)


शासकीय परिवहन सेवा इमारत, तिसरा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई -४०० ०३०.

दुरध्वनी क्र.०२२ २४९४६८८०, Email: cbt.nulm@gmail.com


जावक क्र. DAY-NULM/Death in COVID/D11/2021-22/ 2047 दि. 24 JUN 2021

प्रति,

१. प्रादेशिक उप संचालक तथा विभागीय नोडल अधिकारी,
विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व विभाग)

२. जिल्हा प्रशासन अधिकारी तथा जिल्हा नोडल अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व जिल्हे)

३. शहर प्रकल्प अधिकारी,
महानगरपालिका (सर्व) नगरपरिषद/नगरपंचायत (DAY-NULM)

विषय : DAY-NULM अंतर्गत COVID-१९ संबंधित कर्तव्य बजावतांना कोव्हीडमुळे मृत्यू होणाऱ्या/झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना विमा कवच लागू करण्याबाबत..

संदर्भ :

१. वित्त विभाग, शासन निर्णयक्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.४/व्यय-९, दि. २९ मे २०२०
२. या कार्यालयाचे पत्र क्र. DAY-NULM/ CBTHR/ 164-2/ D11/ 2019-20/ 1317 दि. ०१ जुलै २०२०

उपरोक्त संदर्भ क्र. १ मध्ये नमूद शासन निर्णयान्वये कोव्हीड-१९ परिस्थितीत संबंधित कर्तव्य बजावतांना मृत्यू होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागू करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ (ब) ३ अन्वये "कर्मचारी" यामध्ये सर्व कंत्राटी/ बाह्यस्त्रोतांद्वारे घेतलेले/ रोजंदारी/ तदर्थ/ मानसेवी कर्मचाऱ्यांचा समावेश असेल, असे नमूद आहे. त्यानुषंगाने अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी/ कर्मचारी यांना COVID-19 संदर्भात कामे देत असतांना घ्यावयाच्या काळजीबाबत सविस्तर सुचना या कार्यालयामार्फत यापूर्वीच संदर्भ क्र. २ नुसार देण्यात आलेल्या आहेत.

दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी/कर्मचारी यांचा कोरोनाने मृत्यू झाल्यास किंवा अशा प्रकारची दुर्घटना झाल्यास महानगरपालिकेचे आयुक्त/ नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी संबंधित कंत्राटी अधिकारी/ कर्मचारी यांचे परिपूर्ण प्रस्ताव २४ तासाच्या आत तयार करून संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्याकडे सादर करावे व त्याची आगाऊ प्रत राज्य अभियान

व्यवस्थापन कक्षास पोस्टाद्वारे पाठवावी तसेच "cbt.nulm@gmail.com" या ई-मेल वर स्कॅन करून PDF स्वरुपात पाठवावी.

राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास यापूर्वी प्रस्ताव पाठविलेले असतील तरी सदरचे प्रस्ताव परिशिष्ट अ मध्ये देण्यात आलेल्या आवश्यक कागदपत्रांसह तपासून पुनश्च सादर करावे.

जिल्हा प्रशासन अधिकारी यांनी महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायती कडून प्राप्त प्रस्ताव तपासून आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह २४ तासांच्या आत प्रादेशिक उप संचालक, विभागीय आयुक्त कार्यालय यांना पाठवावा. त्यानुसार प्रादेशिक उप संचालक यांनी जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेला प्रस्ताव तपासून आपल्या स्वयंस्पष्ट शिफारशीसह २४ तासांच्या आत राज्य अभियान व्यवस्थापन कक्षास सादर करावा. प्रादेशिक उप संचालक यांनी पाठविलेले परिपूर्ण प्रस्ताव राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाच्या स्तरावरून उचित कार्यवाही करून शासनास तात्काळ पाठविण्यात येतील.

आपण सर्वांना विदित आहे कि, कोरोना महामारीने अतिशय भयानक स्वरूप धारण केलेले आहे. अशा कठीण परिस्थितीत सुद्धा अभियानांतर्गत सर्व कंत्राटी अधिकारी/ कर्मचारी हे अत्यावश्यक सेवेमध्ये काम करत असून आपला जीव धोक्यात घालून नागरिकांना सेवा सुविधा देण्याचे काम अत्यंत चोखपणे पार पाडत आहेत. अशा परिस्थितीत संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचा दुर्दैवाने कोरोनामुळे मृत्यू झाल्यास संबंधितांच्या कुटुंबास लवकरात लवकर मदत मिळवून देणे हे मानवतेच्या दृष्टीकोनातून आपले आद्य कर्तव्य आहे.

तरी वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या संदर्भात परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, नगरपरिषद प्रशासन संचालनालयास पाठविण्याची दक्षता घेण्यात यावी व मानवतेच्या दृष्टीकोनातून आपले कर्तव्य चोखपणे पार पाडावे.

मा. राज्य अभियान संचालक यांच्या मान्यतेने.

(डॉ. दिपाली भोसले)
उपायुक्त (प्रभारी)
दि.अ.यो.राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान
नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई.

परिशिष्ट "अ"

## आवश्यक कागदपत्रे:

१. DAY-NULM अभियानांतर्गत मूळ नियुक्ती आदेश तसेच वेळोवेळी देण्यात आलेले करार नुतनीकरण आदेश.

२. COVID-19 संबंधित कर्तव्य बजाविण्याबाबत महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायती यांनी दिलेल्या आदेशाची प्रत.

३. संबंधित अधिकारी/कमर्चारी Corona Positive असल्याबाबतचा रिपोर्ट.

४. कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या अधिकारी/ कमर्चारी यांचे मृत्यू प्रमाणपत्र.

५. दवाखान्याने/ हॉस्पिटलने महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायतीला पाठविलेला मृत्यू अहवाल.

६. दैनदिन घेतलेल्या वैद्यकिय उपचाराबाबत अहवाल.

७. कर्तव्यावर हजर असल्याबाबत शहर प्रकल्प अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र व हजेरीपटाची छायांकित प्रत.